**आकाशवाणी नागपूर,**

**प्रादेशिक वृत्त विभाग**

**प्रादेशिक बातम्या (मराठी-वेळ सायंकाळी ०६.००)**

**सोमवार दिनांक ०६ ऑक्टोबर २०२५**

**ठळक बातम्या**

1. **राज्यातल्या २४७ नगरपालिका आणि १४७ नगरपंचायतींच्या नगराध्यक्षपदाच्या आरक्षणाची सोडत जाहीर.**
2. **अभिजात भाषा परिषदेला रिद्धपुर इथं सुरवात/ मराठी विद्यापीठाला संपूर्ण सहकार्य करण्याचा उच्च शिक्षण मंत्री चंद्रकांत पाटील यांचा पुनरुच्चार.**
3. **पारंपरिक शेतीच्या पलीकडे जाऊन नव्या तंत्रज्ञानाचा अंगीकार करण्याचं केंद्रीय मंत्री नितीन गडकरी यांचं शेतकऱ्यांना आवाहन.**
4. **ईशान्य भारताच्या समृद्ध संस्कृतीचं दर्शन घडवणाऱ्या ऑक्टेव्ह"- महोत्सवाला 9 ऑक्टोबरपासून नागपुरात प्रारंभ.**

---------------------------------

आरक्षणाची सोडत

आगामी स्थानिक स्वराज्य संस्थांच्या निवडणुकीसाठी आज २४७ नगरपालिका आणि १४७ नगरपंचायतींच्या नगराध्यक्षपदाच्या आरक्षणाची सोडत मुंबईत झाली. नगरविकास राज्यमंत्री माधुरी मिसाळ यावेळी उपस्थित होत्या. १४७ नगर पंचायतींपैकी अनसुचित जमातींसाठी १३, इतर मागास वर्गासाठी ४०, खुल्या प्रवर्गासाठी ७६ जागा आरक्षित झाल्या आहेत. ३३ नगरपरिषदा, अनसूचित जातीसाठी तर ६७ ओबीसीसाठी आरक्षित आहेत.

---------------------------------

चंद्रकांत पाटील

मराठीच्या विकासासाठी मराठी भाषा विद्यापीठ अमरावती जिल्हयातील रिद्धपूर इथं सुरू करण्यात आलं आहे. या विद्यापीठाने गुणवत्तेची कास धरावी. यासाठी विद्यापीठाला आवश्यक संपूर्ण सहकार्य देऊ, अशी ग्वाही उच्च शिक्षण मंत्री चंद्रकांत पाटील यांनी दिली. अभिजात मराठी भाषा सप्ताहानिमित्त संत गाडगेबाबा अमरावती विद्यापीठात अभिजात भाषेचा दर्जा मिळालेल्या 11 भाषांच्या प्रतिनिधींच्या परिषदेला सुरूवात झाली, यावेळी ते बोलत होते. विद्यार्थ्यांना तांत्रिक विषय आत्मसात करण्यासाठी या अभ्यासक्रमाचे शिक्षण मराठीतून देण्यात येत आहे. गेल्या सत्रात

तंत्रनिकेतनच्या 67 टक्के विद्यार्थ्यांनी मराठीतून परीक्षा दिली आणि एका वर्षात तंत्रनिकेतनमधील प्रवेशाची संख्या दुप्पट झाली आहे अशी माहिती चंद्रकांत पाटील यांनी यावेळी दिली.

---------------------------------

मोदी मुंबई दौरा

नवी मुंबईत आंतरराष्ट्रीय विमानतळाचं उद्घाटन बुधवारी दिनांक ८ ऑक्टोबर रोजी पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्या हस्ते होणार आहे. येत्या डिसेंबर पासून या विमानतळावरुन उड्डाणांना सुरुवात होईल. महाराष्ट्र नगरविकास आणि औद्योगिक विकास महामंडळाचे उपाध्यक्ष आणि व्यवस्थापकीय संचालक विजय सिंघल यांनी ही माहिती दिली.

---------------------------------

मंगलप्रभात लोढा

कौशल्य, रोजगार, उद्योजकता आणि नाविन्यता विभागातर्फे युवकांना उद्योग सुसंगत आणि रोजगाराभिमुख प्रशिक्षण प्रदान करण्याच्या उद्देशाने ‘मुख्यमंत्री अल्पमुदतीचे रोजगारक्षम अभ्यासक्रम’ हा अभिनव उपक्रम राबविण्यात येत आहे. या महत्त्वाकांक्षी कार्यक्रमाच ऑनलाईन उद्घाटन पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्या हस्ते येत्या ८ ऑक्टोबर रोजी करण्यात येणार आहे, अशी माहिती मंत्री मंगलप्रभात लोढा यांनी आज मंत्रालयात आयोजित पत्रकार परिषदेत दिली. या उपक्रमाच्या उद्घाटन प्रसंगी राज्यभरात ६०० ठिकाणी कार्यक्रमांच आयोजन करण्यात येणार असून, या कार्यक्रमांना विश्वकर्मा समाजातील कारागीर, स्थानिक कलाकार आणि पारंपरिक व्यवसायातील तज्ज्ञ यांना प्रमुख पाहुणे म्हणून आमंत्रित केल जाईल. या माध्यमातून त्यांच्या योगदानाला सन्मान मिळेल आणि समाजातील पारंपरिक कौशल्यांविषयी आदरभाव वाढेल असं लोढा म्हणाले.

---------------------------------

भूषण गवई

सर्वोच्च न्यायालयात सर न्यायाधीश भूषण गवई यांच्या खंडपीठात आज एका वकिलान गोंधळ घातला. या वकिलान सरन्यायाधीशांवर कथितपणे आप्पतीजनक वस्तू फेकण्याचा प्रयत्न केला. पोलिसांनी गोंधळ घालणाऱ्या वकिलाला ताब्यात घेतलं आहे. या गोंधळादरम्यान सरन्यायाधीश गवई पूर्णपणे शांत राहिले आणि त्यांनी खटल्याची सुनावणी सुरूच ठेवली.त्यांनतर सरन्यायाधीशांद्वारा सर्वोच्च न्यायालयाच्या वरिष्ठ अधिकाऱ्यांसोबत तातडीची बैठक घेण्यात आली, असं हिंदुस्थान समाचार वृत्त

संस्थेन सांगितलं आहे. दरम्यान, सरन्यायाधीश बी.आर.गवई यांच्यावर झालेल्या हल्ल्याचा निषेध करत रिपाईचे नेते डॉ राजेंद्र गवई यांनी नागरिकांना कायदा आणि सुव्यवस्था अबाधित राखण्याचं आवाहन केलं आहे-

***(होल्ड बाईट- २३ सेकंद)***

***हा भ्याड हल्ला आहे मानसिकदृष्ट्या संतुलन बिघडलेल्या एका बूजदिल व्यक्तीचा हा हल्ला वाटतो. परंतु फुले, शाहु, आंबेडकर विचाराच्या सर्व अनुयायांना मी सांगतो की कोणताही अनुचित प्रकार घडला नाही पाहिजे आपण बाबासाहेब आंबेडकरांची पायीक आहोत बाबासाहेब आंबेडकरांच्या मार्गाने आपल्याला जायचं आहे. संविधानाच्या मार्गाने जायचे आहे शांतता राखा.***

----------------------------------

जीएसटी

वस्तू आणि सेवा परिषदेनं जीएसटी कररचनेत केलेल्या सुधारणा २२ सप्टेंबरपासून लागू झाल्या आहेत. नव्या कररचनेमुळे अनेक वस्तू, पदार्थ स्वस्त झाल्याने ग्राहकांना याचा फायदा होणार आहेच, शिवाय राज्यांच्या अर्थव्यवस्थेलाही मोठ्या प्रमाणात चालना मिळणार आहे. बुलडाणा इथले किरकोळ किरणा व्यापारी अमरचंद कोठारी यांनी या बाबतीत मनोगत व्यक्त केलं आहे.

***(होल्ड बाईट)***

***जीएसटीचा परिणाम असा झालेला आहे. काही जीवनावश्यक वस्तू ज्या आहेत याच्यावर शासनाने जीएसटी कमी केला त्याचा फायदा असा होतो आहे कि जी वस्तू आधी मिळायची त्याच्यापेक्षा आता त्यांचे पैसे वाचत आहे तसेच ड्रायफ्रूईट्स मधल्या सुद्धा काही आयटम याच्यावर बराचसा काही जीएसटी होते ते वगळण्यात आले आहे त्या सर्वांचा परिणाम असा होईल आम्हालाही ज्या नफ्यावर जीएसटी भरावा लागत होता त्याच्यातही कमी होऊन जवळपास किमान १८% आमची सुद्धा बचत होणार आहे आणि कॉमन ग्राहकाचे सुद्धा बऱ्यापैकी बचत होणार आहे.***

----------------------------------

गडकरी

भंडारा जिल्ह्यातील सेंदूरवाफा आणि करडी इथं आयोजित शेतकरी मेळाव्यात केंद्रीय रस्ते वाहतूक आणि महामार्ग मंत्री नितीन गडकरी यांनी शेतकऱ्यांना पारंपरिक शेतीच्या पलीकडे जाऊन नव्या तंत्रज्ञानाचा अंगीकार करण्याचं आवाहन केलं . बदलत्या हवामानामुळे कापूस, सोयाबीन, धान यांसारख्या पारंपरिक पिकांच उत्पन्न कमी होत असल्यान ऊसासारखी नगदी पिक, दुग्धव्यवसाय, शेळीपालन यासारख्या

कृषिपूरक व्यवसायांकडे वळण्याची गरज असल्याचं त्यांनी सांगितलं. आधुनिक काळात शेतीत कृत्रिम बुद्धिमत्ता, ड्रोन, माती परीक्षण आणि सूक्ष्म सिंचन तंत्रांचा वापर अत्यावश्यक आहे. दुग्धव्यवसाय, कुक्कुटपालन आणि शेळीपालन यांसारखे पूरक व्यवसाय शेतकऱ्यांचा आर्थिक कणा मजबूत करतील, असही ते म्हणाले. या मेळाव्याला भंडारा आणि वर्धा जिल्ह्यातील शेकडो शेतकऱ्यांनी हजेरी लावली.

----------------------------------

चंद्रशेखर बावनकुळे

महसूलमंत्री चंद्रशेखर बावनकुळे यांनी नागपूरमध्ये खामला येथील दुय्यम निबंधक कार्यालयात आज दुपारी अचानक भेट दिली. तपासणीदरम्यान एका अधिकाऱ्याच्या ड्रॉवरमध्ये पैसे आढळल्यान त्यांनी तत्काळ पोलिसांना बोलावल. या कारवाईमुळे कार्यालयातील अधिकारी आणि कर्मचाऱ्यांमध्ये मोठी खळबळ उडाली.

----------------------------------

नॉर्थ-ईस्ट फेस्टिवल

सांस्कृतिक मंत्रालयाच्या मार्गदर्शनात पश्चिम क्षेत्र सांस्कृतिक केंद्र, उदयपूर आणि दक्षिण मध्य क्षेत्र सांस्कृतिक केंद्र, नागपूर यांच्या संयुक्त विद्यमाने नॉर्थ-ईस्ट फेस्टिवल "ऑक्टेव्ह" चे आयोजन करण्यात आलं आहे. दिनांक 9 ते 12 ऑक्टोबर दरम्यान दक्षिण मध्य क्षेत्र सांस्कृतिक केंद्र, नागपूरच्या प्रांगणात हा उत्सव आयोजित करण्यात आला आहे. यात पूर्वोत्तर भारतातील 223 कलाकार त्यांच्या अद्वितीय सांस्कृतिक सादरीकरणाद्वारे पूर्वोत्तरच्या समृद्ध परंपरा आणि कलांचा अनुभव प्रेक्षकांना देतील.

भारत सरकारच्या सांस्कृतिक मंत्रालयाद्वारे देशाच्या विविध भागात आयोजित होणाऱ्या या ऑक्टेव्ह फेस्टिवलचा उद्देश भारताची सांस्कृतिक वैविधता व्यापक स्तरावर सादर करणे हा आहे, अशी माहिती दक्षिण मध्य सांस्कृतिक केंद्राच्या संचालक आस्था कार्लेकर यांनी आज पत्रकार परिषदेत दिली-

***(होल्ड बाईट - कार्लेकर- १६ सेकंद)***

***ईशान्य भारतातील राज्यांचा भारताच्या इतर भागांशी संपर्क असावा, तिथल्या संस्कृतीला समजण्याचा एक प्रयत्न आणि इतर भारतीय भारतवासियां पर्यंत त्यांची संस्कृती पोहचावी या हेतूनं संस्कृती मंत्रालय, भारत सरकार यांनी हा "ऑक्टेव्ह " कार्यक्रम आयोजित केला.***

या चार दिवसीय महोत्सवाचं उद्घाटन 9 ऑक्टोबर रोजी संध्याकाळी 6 वाजता होईल. तर १२ ऑक्टोबर पर्यंत दररोज संध्याकाळी 6 ते 8 वाजेदरम्यान सांस्कृतिक संध्येचं

आयोजन करण्यात येणार असून  बांबू शिल्प कार्यशाळा, हस्तशिल्प स्टॉल देखील लावण्यात येणार आहेत.

---------------------------------

आदिवासी दर्जा

गोंदिया इथं  बंजारा, धनगर आणि गोवारी समाजाच्या आदिवासी दर्जा मागणी विरोधात आदिवासी समाजाचा जनआक्रोश मोर्चा काढण्यात आला. सुमारे 30 हजार आदिवासी बांधव जिल्हाधिकारी कार्यालयावर धडकले. यावेळी आदिवासी समाजाने इतर जातींची त्याच्या जातीत होणारी समाविष्टता थांबविण्याची मागणी केली. या मोर्च्याला आमदार संजय पुराम, खासदार प्रशांत पडोळे आणि माजी आमदार सहसराम कोरोटे यांनी पाठिंबा दर्शविला.

---------------------------------

अवैध रेती

गडचिरोली जिल्हा प्रशासनान सिरोंचा परिसरात मोठ्या प्रमाणात कारवाई करत १५ हजार ६६५ ब्रास अवैध रेतीसाठा आणि काही वाहन जप्त केली आहेत. या कारवाईत एकूण २९ कोटी ३६ लाख रुपयांचा दंड प्रस्तावित करण्यात आला आहे.

---------------------------------

हवामान

येत्या काही तासात  वर्धा, यवतमाळ, नागपूर, चंद्रपूर, भंडारा, गडच्रीओली आणि गोंदिया जिल्ह्यांमध्ये काही ठिकाणी  वादळ आणि विजांच्या कडकडाटासह हलका ते मध्यम पाऊस पडण्याची शक्यता नागपूरच्या प्रादेशिक हवामान विभागान वर्तवली आहे.

---------------------------------